Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-II FEB. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

मराठेकालीन न्यायदान पध्दती

डॉ.आर.एन.करपे
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख,
इतिहास विभाग,
डॉ. प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण,
ता. पैठण, जि. औरंगाबाद.

आर.बी.म्हस्के
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडज्ञ
विद्यापीठ, औरंगाबाद.

मराठेकालीन न्यायदान पध्दतीमध्ये स्थानिक न्यायसंस्थांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते. स्थानिक पातळीवर काही स्थानिक न्यायसंस्था न्यायदानाचे व प्रशासन व्यवस्थेचे काम करत असे. त्यांना असणारे अधिकार व कामे परंपरेनेच मान्य केलेली असत. मराठेशाहीतील कालखंडात जमीनदारी पध्दतीचा व न्यायदान पध्दतीचा अत्यंत निकटचा संबंध आढळतो. वतनदारमध्ये देशमुख, देशपांडे, मुकादम, कुलकर्णी, महार व इतर खेडेगावातील बलुतेदार वतनदार त्यांच्या प्रशासकीय कामाबरोबरच न्यायदानाचे कामही करीत असत. थोडक्यात, स्थानिक न्याय प्रशासनात वतनदारीची पध्दती हा पाया होता असेच म्हणावे लागेल. मराठेकालीन स्थानिक न्याय प्रशासन पध्दतीमध्ये विविध संस्था न्यायदान व न्यायनिवाडा करण्याचे प्रत्यक्ष काम करीत होत्या.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये मराठेकालीन न्यायदान पध्दतीमधील तीन संस्थांचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये मजलिस, गोतसभा व पंचायत यांचा समावेश आहे.

१. मजलिस

मजलिस ही मराठेशाहीतील न्यायदान पध्दतीमधील अत्यंत महत्वाची अशी पध्दत होती. मजलिस या शब्दाचा अर्थ मोल्सवर्थ यांच्या मते, रॉयल कोर्ट किंवा असेंब्ली. य. न. केळकर यांच्या मतानुसार दरबार, बैठक तर व्ही. त्रि. गुणे यांनी याचा अर्थ धर्मसभा असा दिला आहे. याचा अर्थ मजलिस म्हणजे राज्यसभा, धर्मसभा किंवा बैठक होय. महाराष्ट्रातील मजलिसचा कार्यकाल इ.स. १४०० ते १७५० इतका आहे. मजलिस न्यायदानाच्या क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती शाहुंपर्यंत अत्यंत प्रभावीपणे काम करीत असलेली दिसून येते.

शिवकालीन प्रशासन व्यवस्थेमध्ये राजा आणि त्याचे राजमंडळ हे मुख्य असत. राजमंडळ हे प्रामुख्याने एक प्रशासकीय व न्यायविषयक कार्यकारी मंडळ होते. न्यायव्यवस्थेचे दोन भाग होते एक केंद्रीय तर दुसरा स्थानिक. मजलिस ही केंद्रीय विभागात न्यायदानाचे राजाबरोबर संयुक्तपणे काम करीत असे. स्थानिक पातळीवर मजलिसचे उपविभाग होते. थोडक्यात, मजलिस म्हणजे ''राजाला न्यायविषयक कार्यात सल्ला देणारी किंवा त्याला न्यायविषयक कार्यात मदत करणारी विद्वान, रुढी, परंपरा, धार्मिक नितीनियम जाणणाऱ्या समाजातील प्रमुख लोकांचा समावेश असलेली राजाश्रीन एक संस्था होय.'' मजलिस म्हणजे 'राजा किंवा त्याचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी ज्या सभेमध्ये एकत्र येवून न्यायदानाचे कामकाज करीत असत ती सभा म्हणजे मजलिस होय.'

मजलिसचे प्रकार

केंद्रीय मजलिस :

केंद्रीय मजलिसमध्ये राजा, न्यायाधीश, पंडितराव आणि राजमुद्रित अधिकारी यांचा समावेश असे. केंद्रीय मजलिसमध्ये छत्रपतीनंतर न्यायाधीश महत्वाचा होता. त्याची नियुक्ती छत्रपतींकडून होत असल्याने तो छत्रतीला जबाबदार असे. न्यायाधीशांच्या अधिकार कक्षेत सर्व प्रकारचे खटले येत असत व ते धर्म, रुढी, परंपरा लक्षात घेवून सोडिवले जात.

केंद्रीय मजलिसमध्ये धार्मिक स्वरुपाच्या खटल्यांची सोडवणूक पंडितराव नावाचा अधिकारी करत असे. कधी–कधी सामाजिकदृष्ट्या क्लिष्ट खटले चालवतांना ब्रम्हसभेची मदत घेतली जाई.

केंद्रीय मजलिसमध्ये छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज स्वत: न्यायदान करत असत. त्यावेळी मंत्री व संबंधित सर्व पदाधिकारी उपस्थित राहत. पण छत्रपती राजाराम महाराज व शाहू महाराज यांच्या कालखंडात मजलिसचे पदाधिकारी स्वत: उपस्थित न राहता बहुतेकवेळा आपला प्रतिनिधी पाठवत, त्यांना कारभारी म्हटले जाई.

स्थानिक मजलिस

१. परगणा मजलिस :

परगणा मजलिसमध्ये सुभेदार व सभासद हे दोन अधिकारी असत. त्यांच्या मदतीला मदतनीस म्हणून मुजुमदार आणि देशलेखक नावाचे अधिकारी असत. परगणा मजलिसमध्ये सुभेदार व सभासदाप्रमाणेच 'काझी' असे. स्थानिक मुस्लिमांचा तो गुरु असल्याने मुस्लिम समाजामध्ये जे खटले निर्माण होत ते त्याच्यासमोर चालत असत व त्याचा निवाडा होत असे.

२. तर्फ मजलिस :

एका परगण्यात अनेक तर्फ म्हणजे तालुक्यांचा समावेश असे. यालाच 'ठाणे मजलिस' म्हणत. तर्फचा प्रमुख अधिकारी 'हवालदार' असे, त्यास 'ठाणेदार' म्हणून सुध्दा संबोधले जाई. तो पगारदार नोकर असे. तर्फच्या अधिकार कक्षेतील खटले यामध्ये चालविले जात असत.

३. ग्राम मजलिस :

न्याय प्रशासन व्यवस्थेमधला शेवटचा घटक म्हणून ग्राम मजलिसकडे पाहिले जाई. तिचा प्रमुख मुकादम किंवा पाटील असे. त्याला मदतनीस म्हणून कुलकर्णी, चौगुला काम पाहत. याशिवाय ग्राम मजलिसमध्ये बलुतेदारांचा समावेश होत असे. खटल्याचे स्वरुप पाहून बलुतेदारांना पाचारण करण्यात येत असे. ग्राम मजलिसमध्ये खटल्याचा न्यायनिवाडा दिल्यानंतर निवाडापत्रावर सर्व बलुतेदार आपले चिन्ह उमटवित असत.

मराठेकालीन मजलिसमध्ये केंद्रीय व स्थानिक मजलिस हे दोन प्रकार असलेले दिसून येतात. यामध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग न्यायदान प्रक्रियेत राहावा अशीही व्यवस्था करण्यात आली होती.

गोतसभा : मराठेकालीन न्यायदान पध्दतीमध्ये 'गोतसभा' अत्यंत महत्वाची मानली जाई. ग्रामीण समाजजीवनातील न्यायदान करणारी एक स्थानिक संस्था म्हणून तिच्याकडे पाहिले जाई. गोत म्हणजे खेडयातील निरनिराळे व्यवसाय करणारे, निरनिराळ्या जातीचे समूह यांना जाती बांधव असेही म्हणत. ज्यांचे जीवन परस्परांच्या मदतीवर आधारलेले आहे, असा ग्रामातील रहिवाशांच संघ म्हणजे गोत होय. गोत म्हणजे गावकरी सत्ता, देशकसत्ता. गोतात गावातील सर्व प्रमुख मंडळी, वतनदार, बलुतेदार व अलुतेदार आणि प्रजा (रयत) यांचा समावेश असे. गोतसभेला राजसत्तेएवढेच महत्व होते. मध्ययुगीन महाराष्ट्रात गावातील रहिवाशांचे तंटे गावसभेने सोडवावेत अशी परंपरा असलेली दिसून येते.

गोतसभेचे प्रकार :

१. परगणा गोतसभा

यामध्ये देशमुख, देशपांडे, शेट–महाजन, मोकादम (पाटील), नायकवाडी, मिरासदार, उपरे व रयत यांचा समावेश असे. परगणा गोतसभेचा मुख्य म्हणून देशमुख काम पाहत असे. तर देशपांडे सहाय्यक असे. परगण्यातील सामाजिक, आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळत असत.

२. तर्फ किंवा कसबा गोतसभा

या सभेमध्ये देशमुख, देशपांडे, शेटे–महाजन, नायकवाडी, पाटील, कुलकर्णी, चौगुला यांचा समावेश होत असे. तर्फ गोतसभेचा 'दिवाण' मजलिसच्या मार्फत न्यायालयीन कामकाज पाहत असे. तर्फ गोतसभेत हजर असणारे सर्वजण निवाडापत्रावर आपाअपल्या खुणा करत असत. ज्यामध्ये पुढीलप्रमाणे चिन्ह असे.

१. महाजन – तराजू
२. सोनार – ऐरण
३. शिंपी – कात्री
४. ठाकूर – कट्यार
५. आवटी – माप
६. माळी – मोठी कात्री
७. नायकवडी – दंडूका
८. जिनगर – करवत

ग्राम गोतसभा :

ग्राम गोतसभेमध्ये गावातील सर्व वतनदार, बलुतेदार, अलुतेदार, मिरासदार, थळकरी, उपरी बरयत यांचा समावेश होतो. गावचा प्रमुख म्हणून मोकादम–पाटील ग्राम गोतसभेचा प्रमुख असे. त्याच्या मदतीसाठी कुलकर्णी व चौगुला असे. ग्राम गोतसभेतील सर्व सदस्य बसून न्यायदानविषयक कामकाज करीत असत. गोतसभेचा निर्णय बदलण्याचा राजालाही अधिकार नव्हता. कारण गोतसभेत एखाद्या निवाडयावर उपस्थित अधिकाऱ्यांची संमत चिन्हे उठविली असतील तर तो न्याय पक्का समजत असे. निवाडापत्रावर असलेली संमत चिन्हे पुढीलप्रमाणे–

१. सुतार – पातळी
२. चांभार – आरी
३. महार – विळा व दोर किंवा घुंगरू बांधलेली काठी
४. कुंभार – चाक
५. न्हावी – आरसा
६. मुलाणा – सुरा
७. भट – सही

पंचायत कार्यपध्दती :

मराठेशाहीत इ.स. १७५० नंतर न्यायदानाच्या क्षेत्रात पंचायतीने कार्य करण्यास प्रारंभ केला. मजलिसचे महत्व कमी झाले व पंचायतीचे महत्व वाढले.

पंचायतही गावच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर भरत असे. खटल्यातील वादी–प्रतिवादी यांची तक्रार पंचायतीसमोर मांडली जात असे. आरोपीला बचावाची संधी दिली जाई. गुन्हा कबूल झाल्यावर पंचायतीचे काम पूर्ण होत असे. पंचायतीच्या निर्णयाला 'सारांश' असे म्हणत. पंचायतीच्या निवाडापत्रावर फडणीसाची सही असे. त्यानंतर मुजुमदाराचा संमतीदर्शक सही–शिक्का असे व तदनंतर निवाडापत्रावर राजाची सही शिक्का असे.

पेशवेकाळात न्यायदान क्षेत्रात पंचायत पध्दतीला अतिशय महत्व होते. दिवाणी स्वरुपाचे सर्व खटले चालवले जाई. पंचायतीमध्ये समाजातील प्रतिष्ठित लोकांचा समावेश केला जात असे. पंचायतीमध्ये प्रत्येक वर्गातील प्रतिनिधीचा समावेश केला जात असे. पंचायतीचे अधिकारक्षेत्र विस्तृत असले तरी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सरकारचा होता.

निष्कर्ष :

१. मराठेकालीन न्यायव्यवस्थेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांपासून मजलिस या संस्थेला न्यायदानाच्या क्षेत्रात महत्वाचे स्थान असलेले दिसून येते.
२. मजलिस संस्थेचे केंद्रीय तथा स्थानिक असे दोन प्रकार प्रामुख्याने आढळून येतात.
३. गोतसभा ग्रामीण समाजजीवनात न्यायदान करणारी संस्था होती ज्यामध्ये देशकांबरोबरच, बलुतेदारांचा समावेश देखील आढळतो.

४. पेशव्यांच्या काळात मजलिसचे महत्व कमी होवून पंचायत पध्दतीचे विशेष योगदान आढळते.

संदर्भ ग्रंथ :

i. कुलकर्णी अ. रा., मराठ्याचा इतिहास, खंड–३ रा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६.
ii. रानडे म. गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, वरदा बुक्स, पुणे, १९९५.
iii. गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
iv. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, २०१०.
v. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२.
vi. लांब व्ही. बी., पेशवेकालीन न्यायव्यवस्था, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com